आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र -रात्री ८..०५ वाजता

२० जुलै २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- येत्या सोमवारपासून सुरू होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर उद्या केंद्रसरकारनं बोलवली सर्वपक्षीय बैठक

- जागतिक वारसा समितीच्या ४६ वं अधिवेशनाचं उद्या नवी दिल्लीत प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- बांगलादेशातून सुमारे एक हजार भारतीय विद्यार्थी मायदेशी सुखरूप परत

- मुंबईतल्या धारावी पुनर्वसन प्रकल्पाची निविदा रद्द करण्याची उद्धव ठाकरे यांची मागणी / या मागणीला काँग्रेसचाही पाठिंबा

**आणि**

- राफेल नदालची स्वीडीश खुल्या टेनिस स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक

**<><><><><>**

संसदेच्या सोमवारपासून सुरू होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारनं उद्या सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीत चालण्यासाठी सर्व पक्षांनी सहकार्य करावं, या दृष्टीनं या बैठकीत चर्चा होईल. संसदेचं हे अधिवेशन १२ ऑगस्टपर्यंत चालेल. केंद्रीय अर्थसंकल्प २३ जुलै रोजी सादर होणार आहे.

**<><><><><>**

जागतिक वारसा समितीचं ४६ वं अधिवेशन उद्यापासून नवी दिल्लीतल्या भारत मंडपम इथं सुरू होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सायंकाळी ७ वाजता

याचं उद्घाटन होणार आहे. या उद्घाटन सोहळ्यात युनेस्कोच्या महासंचालक ऑड्रे अझोले आणि युनेस्को जागतिक वारसा सचिवालयातले वरिष्ठ अधिकारी तसंच विविध देशातले सांस्कृतिक मंत्री, राजदूत आणि तज्ञ उपस्थित राहणार आहेत. भारत पहिल्यांदाच जागतिक वारसा समितीच्या अधिवेशनाचं यजमानपद भूषवणार आहे. हे अधिवेशन वर्षातून एकदा होतं.

**<><><><><>**

UPSC अर्थात केंद्रीय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष मनोज सोनी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. आपला राजीनामा त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे सुपूर्द केला आहे. त्यांचा कार्यकाळ २०२९ मध्ये संपणार होता, पण आपल्या वैयक्तिक कारणांसाठी त्यांनी राजीनामा देत असल्याचं सांगितलं.

**<><><><><>**

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या सदस्यसंख्येत गेल्या मे महिन्यात १९ लाख ५० हजारांची भर पडली आहे. मे २०२४मधे नवीन ९ लाख ८५ हजार पगारदारांनी संघटनेचं सदस्यत्व घेतलं. गेल्या वर्षीच्या मे महिन्यात नोंदल्या गेलेल्या सदस्यसंख्येच्या तुलनेत ही संख्या साडे अकरा टक्क्यांनी जास्त आहे.

**<><><><><>**

सहकार क्षेत्रासाठी नवीन मंत्रालय स्थापन करून केंद्रातील मोदी सरकारनं गेल्या १० वर्षात घेतलेल्या निर्णयांमुळे कृषी आणि सहकार क्षेत्र अधिक बळकट होत असल्याचं केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज पुण्यात सांगितलं. वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकार व्यवस्थापन संस्थेच्या वार्षिक पदवीदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. संस्थेमधील कृषीक्षेत्राशी संलग्न

अभ्यासक्रमाच्या ३२ व्या तुकडीतील ९९ विद्यार्थ्यांना यावेळी मोहोळ यांच्या हस्ते पदव्युत्तर पदविका प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलं.

**<><><><><>**

बांगलादेशमध्ये सध्या सुरू असलेल्या हिंसक संघर्षाच्या काळात बांगलादेशातून सुमारे एक हजार भारतीय विद्यार्थी सुखरूप परत आले आहेत. यापैकी ७७८ विद्यार्थी जलमार्गाने, तर सुमारे दोनशे विद्यार्थी हवाई मार्गाने भारतात परत आल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयानं दिली आहे. ढाका इथलं भारताचं उच्चायुक्तालय, तसंच चित्तगाँग, राजशाही, सिल्हेत आणि खुलना इथली सहायक उच्चायुक्तालयं मदतीनं भारतीय नागरिकांना सुरक्षित परत यायला मदत करत आहेत, आणि बांगलादेशातल्या विविध विद्यापीठांमध्ये शिक्षण घेत असलेल्या ४ हजारापेक्षा जास्त विद्यार्थ्यांशी उच्चायुक्तालय सातत्याने संपर्कात आहे, असंही मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारतात २०२० मध्ये कोविड -१९ महामारीत अत्याधिक मृत्युदर दर्शवणारा ‘सायन्स ॲडव्हान्सेस’ या नियतकालिकातला अहवाल तथ्यहिन असल्याचं सरकारनं म्हटलं आहे. नियतकालिकात प्रकाशित अहवाल चुकीचा असून लेखकांच्या  कार्यपद्धतीत गंभीर त्रुटी असल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे. अहवालातील दाव्यात सुसंगती नसून अस्पष्टता आढळते. या अभ्यासातील निष्कर्ष आणि प्रस्थपित कोविड-१९ मृत्युप्रमाण प्रारूप, यात विसंगतीदेखील दिसते.  यामुळे हा अहवाल विश्वासार्ह ठरत नाही, असं आरोग्य मंत्रालयानं नमूद केलं आहे.

**<><><><><>**

मुंबईतल्या धारावी पुनर्वसन प्रकल्पाची अदानी समूहाला दिलेली निविदा रद्द करून पुन्हा पारदर्शक पद्धतीनं निविदा काढावी, अशी मागणी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते.

धारावीकरांना त्यांच्या हक्काचं ५०० चौरस फुटांचं हक्काचं घर तिथेच मिळायला पाहिजे, ही आपल्या पक्षाची भूमिका असल्याचं ते म्हणाले. काँग्रेसनंही यासंदर्भात राज्य सरकारवर टीका केली आहे. मुंबईतल्या सर्व जमिनींचे अधिकारच अदानी समूहाला देण्याचा भाजपा सरकारचा डाव असल्याचा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. राज्य सरकारची भूमिका गुजरातधार्जिणी असून याबाबत राज्यातल्या जनतेमध्ये रोष असल्याचा आरोप पटोले यांनी केला.

<><><><>

राज्यात जनतेने ज्यांच्या हातात सत्ता दिली त्यांच्याकडून जनतेचे प्रश्न सुटले नाहीत. आता जनतेने महाविकासआघाडीकडून अपेक्षा ठेवल्या असून  मविआ राज्याला स्थिर सरकार देईल, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केला. ते पुण्यात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. पाच वर्षांपूर्वी राज्यात काँग्रेसचा एक आणि राष्ट्रवादीचे चार खासदार निवडून आले. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्राच्या जनतेने ४८ पैकी ३१ खासदार निवडून महाविकास आघाडीला मोठी साथ दिली. याचा अर्थ जनतेचा कल बदललेला आहे, असंही ते म्हणाले. २५ वर्षं मंत्रीपदी राहूनही दिलीप वळसे पाटील यांना मतदारसंघातली कामं करता आली नाहीत, अशी टीका त्यांनी केली.

<><><><>

महाराष्ट्रातल्या नागपूर जिल्ह्यातल्या १३७ गावांमध्ये जेथे कुठलीही मोबाईल सेवा नव्हती तेथे बीएसएनएलची 4 -जी सेवा आता उपलब्ध होत आहे. देशात 4-जी

स्तरावरची मोबाईल सेवा असली पाहिजे या उद्देशाने देशातल्या १ लाख गावांपैकी ज्या  ३४  हजार गावात कोणतीही सेवा नव्हती त्याठिकाणी बीएसएनएलच्या  4जी सेक्युरेशन प्रोजेक्टच्या अंतर्गत बीटीएस टॉवर लावून 4-जी सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प बीएसएनएलने हाती घेतला आहे. या माध्यमातून नागपूर मध्य प्रदेश सीमेवरच्या पारशिवनी, रामटेक अशा तालुक्यातल्या  दुर्गम गावांमध्ये सुद्धा 4-जी सेवा पोचली आहे.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाचं महाअधिवेशन उद्या पुण्यात होणार असून यासाठी केंद्रीय मंत्री अमित शाह आणि नितीन गडकरी उपस्थित राहणार आहेत. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत याबाबत माहिती दिली. यावेळी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे उपस्थित होते. शाह यांच्या भाषणानं अधिवेशनाचा समारोप होईल.

**<><><><><>**

हरयाणामधले कॉंग्रेसचे आमदार सुरेंद्र पवार यांना आज सक्तवसुली संचालनालयाने अटक केली. त्यांच्यावर यमुनानगर भागात अवैध खाणकाम आणि आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे. त्यांना अंबाला जिल्हा आणि सत्र न्यायालयासमोर हजर करण्यात आलं. सक्तवसुली संचालनालयाने १४ दिवसांच्या पोलिस कोठडीची मागणी केली होती,  मात्र न्यायालयाने त्यांना नऊ दिवसांची पोलिस कोठडी दिली आहे.

<><><><>

राफेल नदालने स्वीडीश खुल्या टेनिस स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. क्रोएशियाच्या ड्युए आजुकोविकचा त्यानं ४-६, ६-३, आणि ६-४ असा तीन सेट्स मधे पराभव केला. दुसऱ्या उपांत्य सामन्यात तियागो ऑगस्टीन तिरांते आणि नुनो बोर्जेस यांच्यात लढत होत असून, त्यातल्या विजेत्याचा सामना अंतिम फेरीत नदालबरोबर होईल.

<><><><>

श्रीलंका इथं सुरू असलेल्या महिलांच्या आशिया चषक टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज थायलंडने मलेशियावर २२ धावांनी विजय मिळवला. रंगिरी दांबुला आंतरराष्ट्रीय मैदानात झालेल्या या सामन्यात थायलंडने मलेशियासमोर १३४ धावांचं उद्दिष्ट ठेवलं होतं, मात्र मलेशियाला ८ गडी गमावून १११ धावांपर्यंतच मजल मारता आली.

याच मैदानावर श्रीलंका आणि बांगला देश यांच्यातला सामना सुरू झाला आहे. बांगला देशनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

<><><><>

भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री आणि भूतानचे परराष्ट्र सचिव औम पेमा चोडेन या दोघांनी आज थिंपू इथं तिसऱ्या भारत-भूतान विकास सहकार्य संवादाचं अध्यक्षस्थान भूषवलं. या बैठकीदरम्यान भूतानने प्रकल्पाधारित अर्थसहाय्यासाठीचे प्रस्ताव, तसंच १३व्या पंचवार्षिक कालावधीत राबवण्याच्या प्रकल्पांचे टप्पे याबद्दलचं सादरीकरण केलं. विविध क्षेत्रांमध्ये ४ हजार ९५८ कोटी

रुपये खर्चून राबवण्याच्या ६१ प्रकल्पांना दोन्ही देशांनी मान्यता दिली. याशिवाय भागीदारी, ऊर्जा, व्यापार आणि गुंतवणूक क्षेत्रातल्या द्विपक्षीय सहकार्यावर दोन्ही देशांनी चर्चा केली.

**//<><><><><>//*/***